# पुरवठा साखळीच्या देशव्यापी विस्तारासह फ्लिपकार्ट भारतात आणणार उत्सवी आनंद

- *तीन हजारहून अधिक सुविधा केंद्रांसह अंतिम टप्प्यातील संपर्काचा विस्तार, तृतीय श्रेणी व त्यापलिकडील शहरांमधील अस्तित्व अधिक बळकट*
- *पायाभूत सुविधांच्या या विस्तारामुळे नव्या रोजगार संधींना पाठबळ, एमएसएमई, विक्रेते आणि कारागिरांना बाजारपेठेशी जोडणे अधिक सुलभ*

**बंगळुरू, ८ ऑक्टोबर २०२० :** लक्षावधी नव्या व आधीच्या ऑनलाइन ग्राहकांच्या वाढत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी, तसेच लाखो एमएसएमईज, विक्रेते, कारागिर आणि किराणांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यास पाठबळ देण्यासाठी फ्लिपकार्ट या एतद्देशीय ई कॉमर्स बाजारपेठेने आपल्या पुरवठा साखळीचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला आहे. आगामी उत्सवपर्व आणि बीबीडीमध्ये (बिग बिलियन डेज) भारतातील ग्राहकांच्या दारापर्यंत उत्सवी आनंद पोहोचवणे हा या भव्य गुंतवणुकीचा मुख्य उद्देश आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून फ्लिपकार्टने ग्राहकांना जलद व कार्यक्षम असा ई कॉमर्स अनुभव मिळावा, यासाठी देशभरात तीन हजारहून अधिक केंद्रांच्या माध्यमातून अंतिम टप्प्यातील वितरण यंत्रणेचे सक्षमीकरण केले आहे. या विस्तारामुळे छोट्या शहरांमधील लाखो विक्रेते, एमएसएमईज व कारागिरांनाही फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीच्या माध्यमातून देशभरातील ग्राहकांशी जोडणे शक्य होईल.

एकंदरीत फ्लिपकार्टने देशभरातील आपली फुलफिलमेंट सेंटर्स, मदर हब्ज आणि डिलिव्हरी सेंटर्स या पुरवठा साखळी मालमत्तेत ३.४ दशलक्ष चौरस फुटांची भर घातली आहे. प्रत्येकी पाच लाख चौरस फुटांपर्यंत पसरलेली ही फुलफिलमेंट सेंटर्स विक्रेते आणि खरेदीदार यांच्यात सामानाच्या सुरळीत देवाणघेवाणीसाठी महत्त्वाची आहेत. मदर हब्ज किंवा सॉरटेशन सेंटर्स आणि डिलिव्हरी सेंटर्ससह या फुलफिलमेंट सेंटर्समुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरुपातील रोजगारनिर्मिती होते. या नव्या विस्तारासह फ्लिपकार्टच्या गोदामांचे एकूण क्षेत्रफळ आता १८ दशलक्ष चौरस फूट इतके असून याखेरीज भागिदार ब्रँड्सचे लाखो चौरस फूट क्षेत्रफळही उपलब्ध आहे. याशिवाय, देशभरातील ५० हजारांहून अधिक किराणांचे सामिलीकरण करून फ्लिपकार्टने पुरवठा साखळी अधिक बळकट केली असून उत्सवपर्वात अधिक संख्येने ऑर्डरींचे व्यवस्थापन करणे यामुळे शक्य होईल.

**फ्लिपकार्टच्या ईकार्ट आणि मार्केटप्लेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष अमितेश झा** म्हणाले, "ई कॉमर्सचे लाभ सर्वांना सारख्या प्रमाणात मिळावेत, यासाठी अधिकाधिक ग्राहकांना ऑनलाइनच्या प्रवाहात आणण्यासाठी फ्लिपकार्ट नेहमीच कटिबद्ध राहिली आहे. सध्याच्या महामारीमुळे ई कॉमर्स सेवांना वाढलेल्या मागणीची पूर्तता करण्यासाठी देशभरात, विशेषत: लहान शहरात आमच्या पुरवठा साखळीचे विस्तारीकरण झाले आहे. येत्या काही वर्षांत ई कॉमर्सची होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता या विस्तारामुळे आम्हाला देशभरातील

लाखो ग्राहक आणि विक्रेते व कारागिर यांना एकमेकांशी जलद व कार्यक्षम पद्धतीने जोडणे शक्य होईल. उत्सव पर्वात ही अतिरिक्त जागा आणि गुंतवणुकीमुळे स्थानिक पातळीवरील, विशेषत: लॉकडाउनमुळे जे लोक आपल्या मूळगावी परतले आहेत, त्यांच्यासाठी रोजगार निर्मिती होईल आणि स्थानिक व्यवसायांनाही फ्लिपकार्टच्या माध्यमातून आपल्या व्यवसायाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढवण्याची संधी मिळेल."

ई कॉमर्सचे मोल आणि सुलभतेचा अनुभव घेण्यासाठी लहान शहरांमधून ऑनलाइनच्या प्रवाहात येणाऱ्या लाखो नव्या ग्राहकांना सेवा देण्यासाठी ही विस्तारित पुरवठा साखळी यंत्रणा महत्त्वाची आहे. त्याचप्रमाणे, मेट्रो, तसेच द्वितीय व तृतीय श्रेणीतील शहरे व त्यापलिकडील लडाख, बिष्णुपूर (मणिपूर) आणि दिमापूर (नागालँड) यांसारख्या शहरांमधील फ्लिपकार्टचे अस्तित्व बळकट करण्याबरोबरच स्थानिक पातळीवर हजारो रोजगार निर्माण होण्यासही याची मदत होते. या उत्सव पर्वात फ्लिपकार्ट आपल्या देशव्यापी पुरवठा साखळीच्या माध्यमातून ७० हजार थेट आणि लाखो अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती करत आहे.

कोव्हिड १९ साथीमुळे ग्राहकांच्या खरेदीच्या पद्धतीत आमूलाग्र बदल झाला असून विविध उत्पादन श्रेणीतील विक्रेत्यांचा ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा स्वीकार करण्याची गतीही वाढली आहे. त्यांच्या आयुष्यात आता ई कॉमर्सची भूमिका महत्त्वाची असणार आहे. दैनंदिन आयुष्यातील गरजेच्या वस्तूंपासून सौंदर्य प्रसाधनांपर्यंत आणि घरून काम करण्यासाठी आवश्यक असलेल्या फर्निचरपासून घरगुती उपकरणांपर्यंत ई कॉमर्स देशभरातील ग्राहक व विक्रेत्यांचे पसंतीचे माध्यम बनले आहे. कोव्हिड साथीपूर्वी प्रामुख्याने मेट्रो शहरांमध्ये हा ट्रेण्ड ठळकपणे होता, पण साथीमुळे द्वितीय व तृतीय श्रेणीतील ग्राहक आणि विक्रेतेही ई कॉमर्सकडे आकृष्ट झाले आहेत. उत्सव पर्वाच्या उंबरठ्यावर या प्रदेशांमध्ये फ्लिपकार्टने आपल्या पुरवठा साखळीचा विस्तार केल्यामुळे ग्राहक, विक्रेते, कारागिर आणि परिसंस्थेतील सर्व भागिदार घटकांना लाभ होणार आहे.

आगामी उत्सवपर्व आणि बिग बिलियन डेजच्या पार्श्वभूमीवर फ्लिपकार्ट मोठ्या प्रमाणावर करत असलेल्या रोजगार निर्मितीशी सुसंगत असाच हा पुरवठा साखळीचा विस्तार आहे. यामुळे फ्लिपकार्टच्या पुरवठा साखळीत महिलांचाही सहभाग वाढून ई कॉमर्स अधिक समावेशक होण्यास मदत होईल.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-

centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact [media@flipkart.com](mailto:media@flipkart.com)**